नियमित फौजदारी खटला क्र.७७/२०२५<br>रविंद्र वि. आनंद<br>निशाण क्र. १ लगत

**<u>साक्षीदाराचे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २२३ प्रमाणे सत्यापन्न</u>**

**<u>फिर्यादीपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - रविंद्र शिवाजी परब
वय - ६९ वर्षे
व्यवसाय - सेवानिवृत्त
रा/ने - मुंबई.

१. मी सन २०१६ मध्ये अनंत शंकर दामोदर यांना माझे घर बांधण्यासाठी दिले होते. त्यानंतर त्याची व माझी चांगली ओळख झाली. फेब्रुवारी २०१७ मध्ये मी सेवानिवृत्त झालो. अनंत शंकर दामोदर याला समजले की, मला सेवानिवृत्त झाल्यामुळे पैसे मिळालेले आहेत म्हणून त्याने माझयाकडे २० लाख रुपयाची मागणी केली. आमचे संबंध लक्षात ठेवून त्याला २० लाख रुपये देण्याची मान्य केले. त्यापोटी आमच्यामध्ये एक करार करण्यात आला. सदर करार आम्ही नोटरी अमोल मालवणकर यांच्याकडे नोंदणीकृत केले. अनंत दामोदर यांनी मला आश्वासन दिले की, तीन ते चार महिन्यात पैसे परत करतो. परंतु करारामध्ये शर्त टाकली होती की, एक वर्षाच्या आत पैसे परत करेन, त्यावर मोबदला म्हणून तो मला पणदुर ता कुडाळ येथे स.नं. ८१ या ठिकाणी ५०० क्वेअर फुटाचा फ्लॅट देण्याचे कबूल केले होते. पुढे करारामध्ये असेही त्याने कबूल केले की, जर पणदुर येथे फ्लॅट देणे शक्य नाही झाले तर तो मला तिरवडे ता. मालवण येथील गट नं. ६२३ ही जमिन माझे नावे करुन देणार होता. परंतु त्यानी तिरवडे ता मालवण येथील गट नं. ६२३ ही जमिन सहा महिन्याच्या आत सुशांत रमेश मिठकर यांना विक्री केली.

२. अनंत शंकर दामोदर याने पुढे करारामध्ये असे ही मान्य केले की, जर तो फलॅट, जागा देवू शकला नाही तर त्या रक्कमेवर ३ टक्के व्याज देईल. मी त्यानंतर अनंत दामोदर याच्या घरी एप्रिल २०१८ पासून पैशाच्या मागणी करीता गेलो असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. दि. १७ ऑक्टोबर २०२२ रोजी रात्री ८.३० वा. त्याच्या घरी गेलो असता त्याने मला जिवे मारण्याची धमकी दिली. तशी तक्रार मी ओरोस सिंधुदूर्ग येथे नोंद केलेली आहे. मी त्याला मुंबईवरुन माझ्या वकीलांकडून पैसे परत देण्याकरीता नोटीसा देखील दिलेल्या आहेत. त्यांनी माझे नोटीशीला कोणतेही उत्तर दिलेले नाही.

३. अनंत शंकर दामोदर यांनी मला दि. ०४/१०/२०२१ रोजी वचनचिठ्ठी देखील दिली होती. तो मला वारंवार धमकी देत असल्यामुळे मला सौम्य हृदयविकाराचा झटका आला. वचन चिठ्ठीमध्ये त्याने रक्कम दि. ०१/१२/२०२४ पर्यंत पैसे परतफेड करण्याचे मान्य केले होते. त्यावेळी माझ्यासोबत माझा भाऊ जयवंत रामचंद्र परब हा होता. मी त्यानंतर देखील त्याला नोटीस देवून पैशाची मागणी केली असता त्याने माझ्या नोटीशीला उत्तर दिलेले नाही. त्यानंतर अनंत शंकर दामोदर यांनी मला सांगितले की, तुम्ही तुमच्या पैशासाठी कोर्टात जा, कुठेही जा, मी तुम्हाला पैसे देणार नाही. अशाप्रकारे अनंत शंकर दामोदर यांनी मला मानसिक व शारिरिक त्रास दिलेला आहे. त्यांनी बऱ्याच लाकांना पैशासाठी फसविल्यामुळे त्याच्याविरुध्द तक्रारी आहेत. मी त्याच्या भितीपोटी एकटा फिरु शकत नाही. आरोपीने मला धमकी दिल्यामुळे तसेच मी वारंवार पैशा मागणी करु नये म्हणून तो माझ्या जिवाचे बरेवाईट करु शकतो. याशिवाय मला काहीही सांगावयाचे नाही.

मालवण ----------------------

दि. ०९/१२/२०२५ साक्षीदाराची सही

समक्ष

एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.